# —: प्रेस नोट :—

## बांधकाम उपविभाग कार्यालय, धानोरा येथील कनिष्ठ अभियंता यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

बांधकाम उप विभाग कार्यालय, धानोरा, ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली येथील कनिष्ठ अभियंता श्री. अक्षय मनोहर अगळे, वय-२९ वर्षे, (वर्ग-३) यांना १,७०,०००/- रुपये लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने आज आज रोजी ताब्यात घेतले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांस दि. १९/६/२०२४ व दि. २७/६/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आलोस श्री. अक्षय मनोहर अगळे, वय २९ वर्ष, पद-कनिष्ठ अभियंता, जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग धानोरा, जिल्हा-गडचिरोली यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वतःचे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने तक्रारदारास मौजा-बोधनखेडा पोचमार्ग तुमडीकसा-हिरंगे, रेंगगाव-गोटाटोल, मुरूमगाव-रिडवाही येथील सुधारणा केलेल्या कामाचे एमबी. देण्याकरीता १,७०,०००/-रू लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केली आहे. तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली यांचे पर्यवेक्षणात पो.नि. श्रीधर भोसले व टिम यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांस मौजा-बोधनखेडा पोचमार्ग तुमडीकसा-हिरंगे, रेंगेगाव-गोटाटोल, मुरूमगाव-रिडवाही येथील सुधारणा केलेल्या कामाचे एम.बी. देण्याचे करीता १,७०,०००/-रू लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे, धानोरा, जिल्हा-गडचिरोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी श्री. अक्षय मनोहर अगळे वय २९ वर्ष, पद-कनिष्ठ अभियंता, यांचे घराची ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली चमु कडून झडती घेण्यात आली.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.राहुल माकणीकर, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांचे पर्यवेक्षणात पो.नि. श्रीधर भोसले, पोहवा/राजेश पदमगिरीवार, पो.अं. संदीप उडान, संदिप घोरमोडे, प्रविण जुमनाके व चापोहवा/ प्रफुल डोर्लीकर, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप-अधीक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांनी केले आहे.

**पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली**
**दुरध्वनी क्रमांक - ०७१२-२९५०२०**
**टोल फ्रि क्रमांक - १०६४**

(चंद्रशेखर पी.ढोले)
पोलीस उप-अधीक्षक
ला.प्र.वि.गडचिरोली

Scanned with OKEN Scanner